Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2 730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY QUARTERLY
RESEARCH JOURNAL

# AJANTA







Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

122

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | गडचिरोली जिल्ह्यातील रूढी, प्रथा, परंपरेचा अभ्यास करणे<br>**प्रा. नागसेन मेश्राम**<br>**डॉ. प्रमोद वडते** | १-७ |
| २ | औरंगाबाद शहरातील लिंग गुणोत्तराचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ. वनमाला आर. तडवी** | ८-१२ |
| ३ | चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणकाम व्यवसाय व शेतीवरील परिणामांचा भौगोलीक अभ्यास<br>**प्रा. महेश प्रभाकर रत्नपारखी** | १३-२३ |
| ४ | वैनगंगा नदी खोऱ्याच्या संगम प्रदेशातील चपराळा वन्यजीव अभयारण्य: एक नयनरम्य पर्यटन स्थळ<br>**कु. जोत्स्ना संतोषराव मोंढे** | २४-२७ |
| ५ | मानवाची उत्क्रांती व भाषेचा विकास : एक चिकित्सा<br>**डॉ. संजीव कोळपे** | २८-३४ |
| ६ | जालना जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीची वैशिष्टये<br>**डॉ. गजहंस डी. एस.**<br>**समीना फिरदोस शेख इसराईल** | ३५-४० |
| ७ | भंडारा जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाची संधी व भवितव्ये : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. गणेश एल. धोटे**<br>**प्रा. डॉ. किशोर वाय. ठाकरे**<br>**श्री. राजकुमार दि. पत्रे** | ४१-४६ |
| ८ | जालना जिल्ह्यातील घटते पर्जन्य व गव्हाचे उत्पादन : एक अभ्यास<br>**नारायण जयवंतराव पाझाडे**<br>**किशोर अंकुशराव जावळे**<br>**डॉ. विजयकुमार बैसाने** | ४७-५० |
| ९ | जालना जिल्ह्यातील शेतीमध्ये रासायनिक खताचा वाढता वापर : एक अध्ययन<br>**सुंदर खरात**<br>**डॉ. विजयकुमार बैसाने** | ५१-५४ |





123

VOLUME - VIII, ISSUE – I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ६. जालना जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीची वैशिष्ट्ये

**डॉ. गजहंस डी. एस.**
संशोधक मार्गदर्शक, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.
**समीना फिरदोस शेख इसराईल**
संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**सारांश**

कोणत्याही देशांच्या सर्वांगीण विकासासाठी नैसर्गिक संसाधनाप्रमाणे मानवी संसाधनांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. मानवी संसाधनामध्ये लोकसंख्या या साधनसंपत्तीचा समावेश होतो. लोकसंख्या ही गतिशील व परिवर्तनशील घटक असून त्यात स्थळ व काळ परत्वे बदल होत असतो. आज आधुनिक जगामध्ये सर्वात महत्त्वाच्या प्रश्नामध्ये लोकसंख्या वाढ हा प्रश्न महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर जगामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांची वाढ होत आहे. याचा परिणाम राष्ट्राच्या विकासावर होत आहे. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न मुख्याने अविकसित व विकसिनशील देशात भेडसावत आहे. लोकसंख्या वाढीने जगाच्या काही भागात विस्फोटक स्वरूप धारण केलेले आहे. 'लोकसंख्या वाढ' हा शब्द लोकसंख्येतील बदल या अर्थाने वापरला जातो. लोकसंख्या वाढ ही धन (+) तसे ऋण (–) देखील असु शकते. लोकसंख्य वाढ म्हणजे विशिष्ट कालावधीत झालेला लोकसंख्येतील बदल होय. हा बदल एकंदरीत लोकसंख्येतील बदल व प्रतिशेकडा लोकसंख्येत झालेला बदल या पद्धतीने व्यक्त केला जातो. प्रस्तुत शोध निबंधात जालना जिल्ह्यातील लोकसंख्या 'वाढीचा' अभ्यास तसेच जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. (ग्रामीण व नागरी लोकसंख्या) 2001 व 2011 च्या जनगणनेनुसार द्वितीयक स्वरूपाचे विश्लेषण केले आहे. सन 2001–2011 या दशवार्षिक काळात जालना जिल्ह्यांचा लोकसंख्या वाढीचा दर हा 21.87 टक्के आहे तर ग्रामीण व नागरी लोकसंख्या वाढीचा दर 21.44% (ग्रामीण), 23.70 टक्के (नागरी) आहे. नागरी लोकसंख्या असलेल्या तालुक्यापैकी जालना तालुक्यात नागरी लोकसंख्या सर्वाधिक 55% आढळते.

बीजसंज्ञा :– लोकसंख्या वाढ, ग्रामीण व नागरी लोकसंख्या


**प्रस्तावना**

लोकसंख्या ही एक साधनसंपत्ती आहे, मानवी साधन संपत्तीमध्ये लोकसंख्येला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. लोकसंख्या ही राष्ट्राची मोठी शक्ती समजली जाते कारण कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती बरोबरच त्या देशाचे सार्वभौमत्व, संरक्षण व शास्त्रीयदृष्ट्या देशाचा विकास घडवून आणण्यासाठी लोकसंख्या महत्त्वाची असते. तसेच एखाद्या प्रदेशात भरपूर साधनसंपत्ती असेल आणि तिचा मानवाने उपयोग करून घेतला नसेल तर त्या साधनसंपत्तीला काहीच महत्त्व येणार नाही. लोकसंख्या भूगोलाच्या माध्यमातून लोकसंख्येशी संबंधीत अनेक घटकांचा अभ्यास केला जातो.


अभ्यासक्षेत्र

प्रस्तुत शोधनिबंधासाठी महाराष्ट्र राज्यातील जालना जिल्ह्याची निवड केली असुन जिल्ह्याचे अक्षवृत्तीय स्थान $19^{0}1^{1}$ अक्षांश ते $20^{0}3^{1}$ अक्षांश उत्तर व $74^{0}4^{1}$ रेखांश ते $76^{0}4^{1}$ रेखांश या पूर्व रेखांशामध्ये आहे. जालना जिल्ह्याचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ 7718 चौ.कि.मी. आहे. 2001 च्या जनगणनेनुसार ग्रामिण लोकसंख्या 13,02,287 आणि नागरी लोकसंख्या 3,05,104 आहे तर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 16,07,391 आहे. 2011 च्या जनगणनेनुसार ग्रामिण लोकसंख्या 15,81,610 आणि नागरी लोकसंख्या 3,77,436 आहे तर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 1,607,391 आहे. 2011 च्या जनगणनेनुसार ग्रामिण लोकसंख्या 15,81,610 आणि नागरी लोकसंख्या 3,77,436 आहे तर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 19,59,046 असुन राज्याच्या एकुण लोकसंख्येपैकी 1.74 टक्के आहे.

**महाराष्ट्र राज्य**



जालना जिल्हा




**अभ्यासाचे उद्दिष्ट्ये**

1. जालना जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.
2. जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. जालना जिल्ह्यातील ग्रामिण व (शहरी) नागरी लोकसंख्येचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

जालना जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर केला आहे. मुख्याने जालना जिल्ह्यातील जनगणना पुस्तीका इ.स. 2001 व 2011 चा आधार घेतला आहे. या आधार सामुग्रीतून मिळालेल्या आकडेवाडीचा वापर करून सांख्यकीय विश्लेषण केले आहे. लोकसंख्या वाढ अभ्यासण्यासाठी खालील सुत्राचा वापर केला आहे.

सुत्र :–

$$r = \frac{P_1 - P_o}{Po} \times 100$$

r = लोकसंख्या वाढीचा दसवार्षिक शेकडा दर

$P_1$ = नंतरच्या जनगणनेनुसार लोकसंख्या

$P_o$ = अगोदरच्या जनगणनेनुसार लोकसंख्या

विषय विवेचन


तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ इ.स. 2001–2011. इ.स. 2001 ते 2011 या दहा वर्षाच्या कालखंडातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास केलेला आहे. इ.स. 2001 मध्ये जालना जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 16,07,391 होती. इ.स. 2011 मध्ये जालना जिल्ह्याची लोकसंख्या 19,59,046 इतकी झाली आहे. म्हणजेच इ.स.2001 ते 2011 या दहा वर्षात एकुण लोकसंख्येत 21.87 टक्के वाढ झालेली आहे. तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ तक्ता क्र. 1 मध्ये दाखविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1 तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ– 2001–2011

| अ.क्र. | तालुके | लोकसंख्या 2001 | लोकसंख्या 2011 | वाढ | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भोकरदन | 2,53,430 | 3,11,303 | 57,873 | 22.83 |
| 2 | जाफ्राबाद | 1,36,413 | 1,63,120 | 26,707 | 19.57 |
| 3 | जालना | 4,32,129 | 5,19,018 | 86,889 | 20.10 |
| 4 | बदनापूर | 1,29,466 | 1,53,772 | 24,306 | 18.77 |
| 5 | अंबड | 2,07,142 | 2,55,709 | 48,567 | 23.44 |
| 6 | घनसावंगी | 1,73,082 | 2,11,108 | 38,026 | 21.96 |
| 7 | परतुर | 1,45,495 | 1,77,589 | 32,094 | 22.05 |
| 8 | मंठा | 1,30,234 | 1,67,427 | 37,193 | 28.55 |
| एकुण जालना जिल्हा | | 16,07,391 | **19,59,046** | **3,51,655** | **21.87** |

स्रोत :– जनगणना अहवाल / पुस्तीका 2001 व 2011.

आलेख क्र. 1 तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ– 2001–2011



जालना जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करतांना गेल्या दहा वर्षाच्या (2001–2011) या आकडेवारीचा ... ... तला आहे. इ.स. 2001 ते 2011 या दहा वर्षात 30 टक्के पेक्षा जास्त वाढ एकाही तालुक्यात झालेली नाही. ... = 30 टक्क्याच्या दरम्यान झालेली लोकसंख्या वाढ ही मंठा तालुक्यात झाली आहे. 20 ते 25 टक्कयाच्या दरम्यान ... लोकसंख्या वाढ ही अंबड, भोकरदन, परतुर, घनसावंगी आणि जालना तालुक्यात झाली आहे. 20 टक्क्यापेक्षा ... ...कसंख्या वाढ जाफ्राबाद आणि बदनापूर तालुक्यात झालेली आहे.

2011 च्या जनगणनेनुसार सर्वात जास्त लोकसंख्या वाढ मंठा तालुक्यात (28.55%) झाली असून सर्वात ... ...कसंख्या वाढ बदनापूर तालुक्यात (18.77%) झाली आहे.

तक्ता क्र. 2 ग्रामिण व नागरी लोकसंख्येत झालेली वाढ– 2001–2011

| अ.क्र. | तालुके | टोटल | ग्रामिण | नागरी | टोटल | ग्रामिण | नागरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2001 | | | 2011 | |
| 1 | भोकरदन | 2,53,430 | 2,39,241 | 14,189 | 3,11,303 | 2,86,680 | 24,623 |
| | | | 94.40 | 5.59 | | 92.09 | 7.90 |
| 2 | जाफ्राबाद | 1,36,413 | 1,36,413 | 0 | 1,63,120 | 1,63,120 | 0 |
| | | | 100 | 0 | | 100 | 0 |
| 3 | जालना | 4,32,129 | 1,96,334 | 2,35,795 | 5,19,018 | 2,33,524 | 2,85,494 |
| | | | 45.43 | 54.56 | | 44.99 | 55.00 |
| 4 | बदनापूर | 1,29,466 | 1,29,466 | 0 | 1,53,772 | 1,53,772 | 0 |
| | | | 100 | 0 | | 100 | 0 |
| 5 | अंबड | 2,07,142 | 1,81,034 | 26,108 | 2,55,709 | 2,24,269 | 31,440 |
| | | | 87.39 | 12.60 | | 87.70 | 12.29 |
| 6 | घनसावंगी | 1,73,082 | 1,73,082 | 0 | 2,11,108 | 2,11,108 | 0 |
| | | | 100 | 0 | | | 0 |
| 7 | परतुर | 1,45,595 | 1,16,483 | 29,012 | 1,77,589 | 1,41,710 | 35,879 |
| | | | 80.05 | 19.94 | | 79.79 | 20.20 |
| 8 | मंठा | 1,30,234 | 1,30,234 | 0 | 1,67,427 | 1,67,427 | 0 |
| | | | 100 | 0 | | 100 | 0 |
| | टोटल | | **13,02,287** | **3,05,104** | | **15,81,610** | **3,77,436** |
| | | | **81.01** | **18.98** | | 80.73 | 19.26 |

**स्रोत** :– जनगणना अहवाल /पुस्तीका 2001 व 2011.

जालना जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील ग्रामिण व नागरी लोकसंख्येचा विचार करता 2001 च्या ...नेनुसार जालना जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येपैकी 80.01 टक्के लोकसंख्या ही ग्रामिण भागात आढळते तर ... लोकसंख्येपैकी 18.98 टक्के लोकसंख्या ही शहरी भागात आढळते तर नागरी लोकसंख्या असलेल्या ...पैकी जालना तालुक्यात 54.56 टक्के नागरी लोकसंख्या आढळते. परतुर 19.94 टक्के नागरी लोकसंख्या .... परतुर 19.94 टक्के, अंबड 12.60 टक्के तर सर्वात कमी नागरी लोकसंख्या भोकरदन तालुक्याची 5.59 टक्के ... आहे. जर महाराष्ट्र राज्याचा विचार करता एकुण लोकसंख्येपैकी 57.57 टक्के लोकसंख्या ही ग्रामिण भागात .... तर (राज्याच्या) एकुण लोकसंख्येपैकी 42.43 टक्के लोकसंख्या ही शहरी भागात आढळते. 2011 च्या



128

जनगणनेनुसार एकुण लोकसंख्येपैकी जालना जिल्ह्यात 80.73 टक्के लोकसंख्या ही ग्रामिण तर 19.26 टक्के लोकसंख्या ही शहरी भागात आढळते. जाफ्राबाद, बदनापूर, घनसावंगी व मंठा या भागात ग्रामिण लोकसंख्या सर्वाधिक आहे. कारण ही तालुके ग्रामिण वर्गवारीत मोडणारी आहे. त्या खालोखाल नागरी वर्गवारीत मोडणाऱ्या भोकरदन तालुक्याची ग्रामिण लोकसंख्या 92.09 टक्के आहे. तर सर्वात कमी ग्रामीण लोकसंख्या जालना तालुक्यात 44.99 टक्के आहे. जर महाराष्ट्र राज्याचा विचार करता एकुण लोकसंख्येपैकी 54.77 टक्के लोकसंख्या ही ग्रामिण भागात आढळते. तर एकुण लोकसंख्येपैकी 45.23 टक्के लोकसंख्या ही शहरी भागात आढळते. सर्वाधिक नागरी लोकसंख्या जालना तालुक्याची 55.00 टक्के इतकी आहे तर नागरी वर्गवारीत मोडणाऱ्या तालुक्यांपैकी सर्वात कमी नागरी लोकसंख्या भोकरदन तालुक्याची आहे आणि ती फक्त 7.90 टक्के आहे.

निष्कर्ष

1. 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये जालना जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये लोकसंख्या वाढ दिसून आली आहे.
2. इ.स. 2001 ते 2011 या दहा वर्षातील लोकसंख्या वाढ सर्वात जास्त मंठा तालुक्यात (28.55) टक्के वाढ झाली आहे.
3. इ.स. 2001 ते 2011 या दहा वर्षातील लोकसंख्या वाढ सर्वात कमी बदनापूर तालुक्यात 18.77 टक्के झाली आहे.
4. ग्रामिण व नागरी लोकसंख्येमध्ये बरीच तफावत आढळून येते. कारण नागरी भागापेक्षा ग्रामिण भागात लोकसंख्या अधिक प्रमाणात दिसुन येते.
5. जिल्ह्यात फक्त जालना तालुक्यात नागरिकरण हे मोठ्या प्रमाणात होत आहे. तर बहुतांश तालुक्यामध्ये नागरिकरण हे प्राथमिक अवस्थेतच आढळून येते.

संदर्भ

1. के.ए. खतीब (2011), लोकसंख्या भुगोल, विद्या बुक पब्लिकेशन.
2. शंकरराव शेटे व सुरेश फुले (1998), लोकसंख्या भुगोल, अभिजीत पब्लिकेशन, लातुर.
3. ए.बी. सवदी व पी.एस. कोळेकर (2014), भुगोलाची मुलतत्त्वे (खंड दुसरा) निराली प्रकाशन, पुणे.
4. डॉ. घारपुरे व्ही.टी. (1985), लोकसंख्या भुगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर.
5. Govt. of Maha (2001) District Census handbook.
6. Govt. of Maha (2001) District Census handbook.